# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती

(महाराष्ट्र शासाची स्वायत्त संस्था)

*"Towards Global Technological Excellence"*

दु. . . (०७२१) २५३१९२९, २५३१९३०  फॅक्स (०७२१)२५३१९३१

सं`त स्थळ : www.gcoea.ac.in  ई मेल : principal@gcoea.ac.in


परिपत्रक

क्र.शाअमअ/आस्था २अ/२०२३/ ५११२
दिनांक : १४ /१२/२०२३

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्र.१२/आस्था (२)/संप/२०२३/९५८,
दि. १३ डिसेंबर २०२३

संदर्भिय परिपत्रकान्वये, महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने जुनी पेंन्शन योजना मिळणेबाबत सर्व शासकीय कर्मचारी दि. १४ डिसेंबर २०२३ पासून बेमुदत संपावर जाणार असल्याचे संचालनालयाचे निदर्शनास आले आहे. दि. १४ डिसेंबर २०२३ पासून बेमुदत संपात सहभागी न होता कर्तव्यावर उपस्थित रहावे. तसेच शासकीय कर्मचा-यांनी संपात भाग घेणे गैरवर्तणूक बाब समजण्यात येवून अश्या कर्मचा-याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल तसेच उपरोक्त कार्यकाळात कोणत्याही अधिकारी/कर्मचा-यांना कोणत्याही प्रकारची रजा मंजूर केली जाणार नाही व संपात सहभागी झाल्यास काम नाही वेतन नाही या धोरणाची अमंलबजावणी केली जाईल असे सुध्दा संचालनालयानी कळविले आहे.

त्याअनुषंगाने, महाविद्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी दि. १४ डिसेंबर २०२३ पासुन होणा-या संपात सहभागी न होता कर्तव्यावर हजर रहावे. संपकाळात कोणत्याही अधिकारी/कर्मचा-यांनी पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडुन जावू नये तसेच कोणत्याही अधिकारी/कर्मचा-यांना संपकाळात रजा मंजूर करता येणार नाही. करीता वरील सर्व सुचनांची अधिकारी/कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य
शासकीय अभियात्रिकी महाविदयालय,
अमरावती.

प्रत:- १) विभाग प्रमुख स्थापत्य, उपयोजीत यंत्रशास्त्र, यंत्र, विद्युत, अणुविद्युत, संगणक, उपकरणीकरण, माहीती तंत्रज्ञान, परिक्षा विभाग, रसायनशास्त्र, गणित, भौतीकशास्त्र,वसतिगृह (मुलांचे/मुंलीचे)/ग्रंथालय, कार्यालय, परिक्षा नियत्रंक, यांना माहीती व अधिकारी/कर्मचा-यांना परिचलीत करण्याकरीता अग्रेषित.

२) समन्वयक, डाटा सेंन्ट्र आवाश्यक कार्यवाहीकरीता .